जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- २५७ दिनांक :- १५/०९/२०२१

## एम.डी.(मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ बाळगणा-या ईसमाकडून ३७८ ग्रॅम वजनाचा एम.डी. हस्तगत- अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांना दिनांक १४/०९/२०२१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, मिरारोड (पुर्व), रेल्वे स्टेशन जवळील सर्कल परिसरात एक ईसम एम.डी. (मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ कब्ज्यात बाळगुन विक्रीकरीता येणार आहे.

सदर मिळालेली बातमी वरिष्ठांना कळवुन डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे छापा कारवाई करण्यात आली. सदर कारवाईचे दरम्यान ईसम नामे सादक रशीद अन्सारी वय-१९ वर्षे, रा. एम. जे. अपार्टमेंट, रुम.क्र.०२, तळमजला, रहमत नगर, नगीनदासपाडा, विरार रोड, नालासोपारा (पुर्व) ता. वसई, जि.पालघर याचे कब्ज्यात एकुण ३७८.८ ग्रॅम वजनाचा एकुण १८,९४,५००/-रु. किंमतीचा एम.डी. (मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ मिळुन आला. सदर अंमली पदार्थ मॅफेड्रॉन जप्त करण्यात आलेला असुन नमुद आरोपीविरुध्द अंमली पदार्थ कायदयापमाणे नयानगर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ५०८/२०२१ प्रमाणे दाखल करण्यात आला असुन त्यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास नयानगर पोलीस ठाण्याकडुन चालु आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक, श्री. देवीदास हंडोरे, सहा.पोलीस निरीक्षक विलास कुटे, पो.हवा. २१८८/धनाजी इंगळे, पोना.२५४/पवन पाटील, पोशि.३४७२/अजय यादव, पो.शि. ३२५८/ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केली आहे.